# Good Work Of Nagpur Rural Police

## वाहतूक शाखेमार्फत प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

दिनांक १८/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा. ते १२.०० वा. पर्यंत पोलीस मुख्यालय नागपूर (ग्रामिण), नागपूर येथे नागपूर (ग्रामिण) जिल्हयामध्ये जे वाहन चालक रोडवर दिलेल्या वेगमर्यादेचे उल्लंघन करुन वाहन चालवितात त्यांचे विरुद्ध वाहतूक अधिकारी /कर्मचारी यांचे मार्फत  मोटार वाहन कायदा कलम ११२/१८३ प्रमाणे वेगमर्यादेचे उल्लंघनबाबत कार्यवाही करण्यात येते. सदर कार्यवाही ''स्पिड-गन'' च्या साहाय्याने करण्यात येते. याबाबत मुंबई येथून करण्यात आलेले प्रतिनिधी सर्व्हीस इंजिनियर श्री. किसन परखीया व श्री. सुरज भिंगार्डे यांनी स्पिड गनचे मशिन बाबत वाहतूक अधिकारी/कर्मचारी  यांना कार्यप्रणालीबाबत  प्रशिक्षण देण्यात आले आहेत.

तसेच जे वाहन चालक मद्य प्राशन करुन वाहन चालवितात. अशा वाहन चालकाविरुद्ध मोटार वाहन कायद्याचे कलम १८५ अन्वये (ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह) कार्यवाही करण्यात येते. सदर कार्यवाही ''ब्रेथ ॲनॉलायझर'' मशिनव्दारे परिक्षण करण्यात येते. सदर ''ब्रेथ ॲनॉलायझर'' मशिनव्दारे चाचणी करतांनी घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळेत पोलीस अधिक्षक श्री. अनंत रोकडे, तसेच अपर पोलीस अधिक्षक श्री. नरसिंग शेरखाने, प्रभारी पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर श्री. एच.जी. चांदेवार, यांचे मार्गदर्शनात वाहतूक अधिकारी /कर्मचारी यांना ''स्पिड-गन'' ''ब्रेथ ॲनॉलायझर'' बाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमात जिल्हयातील पोलीस स्टेशन मधील वाहतूक कर्मचारी तसेच जिल्हा वाहतूक शाखेतील अधिकारी श्री. नरेंद्र गौरखेडे, समन्वय अधिकारी श्रीमती वर्षा वंजारी, सदर कार्यशाळेत पोलीस हवालदार श्री. महेंद्र सरपटे, पोलीस नाईक श्री. शैलेश वराडे, पोलीस शिपाई श्री. किशोर वानखेडे यांनी साहाय्य केले असुन ५७ वाहतूक कर्मचारी हजर होते. पोलीस उपनिरीक्षक श्री. रमेश ताजने यांनी आभार व्यक्त केले.



